**5वी भारत-ताजिकिस्तान परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (01 एप्रिल 2026)**

02 एप्रिल 2026

भारत आणि ताजिकिस्तानने 01 एप्रिल 2026 रोजी दुशान्बे, ताजिकिस्तानमध्ये परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीच्या 5वी फेरी आयोजित केली. या सल्लामसलतीचे सह-अध्यक्षपद भारतीय बाजूने सचिव (पश्चिम) राजदूत सिबी जॉर्ज आणि ताजिकिस्तानच्या बाजूने परराष्ट्र व्यवहार उपमंत्री श्री. इदिबेक कलंदर यांनी भूषवले.

2. राजकीय, संरक्षण, सुरक्षा, व्यापार आणि अर्थव्यवस्था, संस्कृती, शिक्षण आणि वाणिज्य दूतावास या क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्याच्या स्थितीचा उभय बाजूंनी व्यापकपणे आढावा घेतला. दोन्ही बाजूंनी बहुपक्षीय चौकटीत सहकार्यावर चर्चा केली आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवर विचारांची देवाणघेवाण केली.

3. या भेटीदरम्यान, सचिव (पश्चिम) यांनी ताजिकिस्तानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहिम श्री. सिरोजिद्दीन मुहरीद्दीन यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत दोन्ही बाजूंनी परस्परांच्या हिताची भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या आणि द्विपक्षीय सहकार्याची व्याप्ती वाढविण्याच्या मार्गांवर चर्चा केली.

4. सचिव (पश्चिम) यांनी दुशान्बे येथील भारतीय समुदाय आणि भारतीय मित्रमंडळ सदस्यांशी संवाद साधला आणि भारत-ताजिकिस्तान संबंध दृढ करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची प्रशंसा केली. याप्रसंगी त्यांनी, दुशान्बे येथील सद्रिद्दीन अयनी यांच्या नावे असलेल्या 'ताजिक स्टेट पेडागॉजिकल युनिव्हर्सिटी', खुजांद येथील 'ताजिक स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ कॉमर्स'ची 'इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमी अँड ट्रेड' आणि कुलोब येथील 'प्रोफेशनल टेक्निकल इनोव्हेशन लायसियम' या तीन भारतीय कॉर्नर्सचे उद्घाटन केले

5. सचिव (पश्चिम) यांनी मिर्झो तुर्सुनझोडा यांच्या नावे असलेल्या 'ताजिक स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर अँड आर्ट्स'ला भारतीय वाद्यांचा संच भेट दिला. तसेच, दोन्ही देशांमधील क्रीडा आणि युवक देवाणघेवाणीला चालना देण्यासाठी त्यांनी ताजिकिस्तानच्या मुलांच्या आणि मुलींच्या राष्ट्रीय फुटबॉल संघांना 'मेड-इन-इंडिया' फुटबॉल संच प्रदान केले.

6. सचिव (पश्चिम) यांची ही भेट भारताच्या 'विस्तारित शेजारी' धोरणाला अनुसरून आहे; ज्याचा उद्देश ताजिकिस्तान आणि इतर मध्य आशियाई देशांसोबतचे संबंध दृढ करणे हा आहे, ज्यांच्याशी भारताचे मैत्री आणि सहकार्याचे दीर्घकालीन ऋणानुबंध आहेत.

7. 4. उभय बाजूंनी परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतांची पुढील फेरी परस्पर सोयीस्कर तारखेला नवी दिल्ली येथे आयोजित करण्यास सहमती दर्शविली.

दुशान्बे

02 एप्रिल 2026